# महाराष्ट्र विधानसभा

**पहिले अधिवेशन, २०२३**

**सन २०२३-२४ च्या अर्थसंकल्पीय मागण्या**

**माननीय अध्यक्षांनी मान्य केलेल्या कपात सूचनांची यादी**

**बुधवार, दिनांक १५ मार्च, २०२३**

## पाणीपुरवठा आणि स्वच्छता विभाग

**कपात सूचनांची एकूण संख्या - ७**

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **मागणी क्रमांक: वाय-२**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२१५ पाणी पुरवठा व स्वच्छता**<br>**रूपये:- ७७,११,६४,३७,०००/-**<br>**श्री. अजित पवार** |
| (१) | ४९६२ | १० | "राज्याचे पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री ज्या जळगाव जिल्ह्यातून येतात त्याच जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर 'हर घर जल' योजनेची अंमलबजावणी झालेली नसणे, सुमारे अनेक कोटी रुपये खर्चाची पाणीपुरवठा योजना असतानाही जळगाव जिल्ह्यातील वरणगाव शहरातील नागरिकांना मोठ्या प्रमाणावर पाणीटंचाईचा सामना करावा लागत असणे, महिन्यातून केवळ एकदा पाणीपुरवठा केला जात असल्यामुळे शहरातील नागरिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत असणे, तसेच शहरासाठी २५ कोटी रुपयांची योजना मंजूर झालेली असताना व योजनेच्या कामाला तीन वर्ष होऊन मुदत संपूनही अद्याप पर्यंत योजना पूर्ण झालेली नसणे, योजनेचे कामकाज निकृष्ट प्रतीचे होत असल्याबाबत नागरिकांच्या तक्रारीवर शासनाने कोणतीही कार्यवाही केलेली नसणे, पाण्याचा उद्भव असलेल्या तापी नदीतील जॅकवेलमध्ये पुराच्या पाण्याचा गाळ साठलेला असणे, आठ किलोमीटर अंतरावरील मुख्य जलवाहिनीला लागलेली गळती, परिणामी शहरवासीयांना करावी लागत असलेली वनवन भटकंती, यासंदर्भात शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही तथा उपाययोजना" |
| (२) | ४९६५ | १० | "ठाणे जिल्ह्यातील ग्रामीण भागाचा जलदगतीने विकास सुरू असताना, ग्रामीण भागातील 180 ग्रामपंचायतीमधील पाण्याचे स्त्रोत हे दूषित असल्याचे उघडकीला आलेले असणे, मुरबाड जिल्ह्यातील मिलहे ग्रामपंचायतीतील सावरेवाडी या पाड्यावरील पाण्याचा स्त्रोत तीव्र जोखमीचा असल्याची गंभीर बाब समोर आलेली असणे, त्यामुळे या ग्रुप ग्रामपंचायत मध्ये शेकडो ग्रामस्थांच्या आरोग्याचा निर्माण झालेला प्रश्न, जिल्ह्यातील पाच तालुक्यांमध्ये जिल्हा परिषदेच्या वतीने स्वच्छता सर्वेक्षण अभियान राबविण्यात आलेले असणे, या अभियानामध्ये जलस्त्रोतांची पाहणी करण्यात आली असता अनेक ग्राम पंचायतीमधील ८१० गावांमध्ये नळ योजना, विहिरी, हातपंप या पाण्याच्या स्त्रोतांची पाहणी करून पाण्याचा दर्जा ठरवण्यात आला असता मोठ्या प्रमाणावर पाणीपुरवठ्याचे स्त्रोत दूषित असल्याचे आढळून आलेले असणे, यासंदर्भात शासनाने तातडीने पर्यायी उपाययोजना करून |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | पाणीपुरवठा करण्याची आवश्यकता, याकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष, यासंदर्भात करावयाची तातडीची कार्यवाही तथा उपाययोजना" |
| (३) | ४९६८ | १० | "रायगड जिल्ह्यातील रोहा तालुक्यातील जलवाहिन्यांवर पाणी माफीयांनी दरोडा टाकलेला असणे, 26 गावांना पाणीपुरवठा करणाऱ्या जलवाहिनी मधून सर्रासपणे वीटभट्ट्या तसेच बांधकामासाठी पाण्याची चोरी होत असणे, तहसीलदारांकडून या पाण्याच्या चोरीकडे होत असलेले दुर्लक्ष, परिणामी यंदा पाण्याची निर्माण झालेली मोठी टंचाई, रोहा एमआयडीसी मधील कारखान्यांनी कुंडलिका नदीतील पाणी प्रदूषित करून टाकल्यामुळे एमआयडीसी ने जीवन प्राधिकरणाच्या माध्यमातून 26 बाधित गावांसाठी पाणीपुरवठा योजना सुरू केलेली असणे, मात्र जलवाहिनीतून पाणी चोरी होत असल्याची तक्रार सरपंचांनी करून देखील याकडे प्रशासनाचे होत असलेले दुर्लक्ष, यासंदर्भात शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही तथा उपाययोजना" |
| (४) | ४९६९ | १० | "छत्रपती संभाजीनगर शहराच्या पाणीपुरवठ्याची योजना संथ गतीने सुरू असल्याचे निदर्शनास येत आहे, 2006 पासून सुरू असलेली समांतर पाणीपुरवठा योजना बारगळल्यानंतर औरंगाबाद शहरासाठी १६८० कोटी रुपयांची नवीन पाणीपुरवठा योजना मंजूर केली असताना, अद्यापही सदर योजनेचे काम अतिशय संथ गतीने सुरू असल्यामुळे या कामाचे कंत्राट दिलेल्या कंपनीकडून विहित मुदतीत काम पूर्ण करून घेण्यासाठी शासनाला येत असलेले अपयश, परिणामी शहरातील नागरिकांच्या मनामध्ये शासनाबद्दल पसरलेली नाराजीची भावना, यासंदर्भात शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही तथा उपाययोजना" |
| (५) | ४९७१ | १० | "साबळेवाडी, तालुका इंदापूर, जिल्हा पुणे परिसरातील जलजीवन मिशन अंतर्गत पाणीपुरवठा योजना राबवली जात असून त्याचे काम निकृष्ट व योग्य पद्धतीने न झाल्यामुळे नागरिकांमध्ये नाराजी पसरलेली असणे, सदर योजनेसाठी चार कोटी पन्नास लाख रुपयांचा निधी शासनाने उपलब्ध करून दिलेला असताना अंदाज पत्रकानुसार सव्वाचार फूट खुदाई होणे अपेक्षित असताना ठेकेदार केवळ दोन फूट खोदाईतच जलवाहिनी बसवीत असल्याचे उघडकीला आलेले असणे, यासंदर्भात सदर योजनेचे काम दर्जेदार होण्यासाठी राज्य शासनाने करावयाची कार्यवाही तथा उपाययोजना" |
| (६) | ४९७४ | १० | "शहापूर तालुक्यातील गाव पाड्यांमध्ये माहे डिसेंबर पासून पाणीटंचाई उद्भवल्यामुळे टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यास सुरुवात झालेली असणे, आदिवासी भागातील ग्रामीण भागातील महिला भगिनींना पाण्यासाठी दाही दिशा भटकंती करावी लागत असल्यामुळे आणि शहापूर तालुक्यातील भातसा, वैतरणा, मोडक सागर या धरणांमधून मुंबई महानगराला पाणीपुरवठा होत असताना शहापूर तालुका मात्र तहानलेलाच राहिलेला असणे, बोरवेल तसेच विविध पाणी योजना राबवूनही महिलांना पाण्यासाठी भटकंती करावी लागत असणे, परिणामी शासनाचे दरवर्षी |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | कोट्यावधी रुपये टँकरवर खर्च होत असल्यामुळे तालुक्यातील नारळवाडी, पारद वाडी व चिंतामणवाडी तसेच धामणी ग्रामपंचायत मध्ये जरंडी, गोलभन, भुईपाडा तर लूप मधील कोळी पाडा व वारली पाडा अशा गावपाड्यांना अधिक टँकर लावून पाणीपुरवठा करण्याची होत असलेली मागणी, यासंदर्भात शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही तथा उपाययोजना” |
| | | | **मागणी क्रमांक: वाय-२**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२१५,पाणी पुरवठा व स्वच्छता,**<br>**रूपये:- ७७,११,६४,३७,०००/-**<br>**श्री. अस्लम शेख** |
| (७) | ४९४९ | १० | मौ. करडखेड, ता. देगलूर,जि.नांदेड येथे मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रम अंतर्गत रु.७५.२० लाख किंमतीच्या नळपाणी पुरवठा योजनेस दिनांक १७.६.२०१७ रोजी प्रशासकीय मान्यता दिली असणे, मात्र नळपाणी पुरवठा योजनेचे काम सुरु झाले नसणे, ठेकेदारांनी काम वेळेत पूर्ण केले नसणे, ठेकेदार व संबंधित अधिकाऱ्यांचे रुग्णालय असणे, त्यामुळे नळपाणी पुरवठा योजनेस दिरंगाई होत असणे, परिणामी ग्रामस्थांना पिण्याच्या पाण्याअभावी रहावे लागत असणे, पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई निर्माण झाली असणे, अधिकाऱ्यांनी व ठेकेदारांनी ७५ लाख रुपयाचा गैरव्यवहार व भ्रष्टाचार केला असल्याचे उघडकीस आले असणे, तथापी प्रशासन त्याकडे दुर्लक्ष करीत असणे, चौकशी करण्याची आवश्यकता निर्माण झाली असणे,याकडे शासनाने केलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी रहिवाशात निर्माण झालेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व तातडीची उपाययोजना. |

**विधान भवन**
**मुंबई,**
**दिनांक : १४ मार्च, २०२३**

**राजेन्द्र भागवत,**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

**याची प्रत :**

(१) मंत्री व राज्यमंत्री
(२) विधानसभेचे सर्व सदस्य.
(३) पाणीपुरवठा आणि स्वच्छता विभाग (१० प्रती)
(४) संसदीय कार्य विभाग.
(५) वित्त विभाग.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई